| MHAU100002642024 | <u>नियमित दिवाणी दावा/**26/2024**</u><br><br>**रत्नाकर दामोदर म्हस्के वि.. कचरू लक्ष्मण म्हस्के** |
|---|---|

<u>निशाणी २२ वरील आदेश</u>

वादीने आदेश १ नियम १० दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे दाव्यामध्ये आवश्यक पार्टीधारक म्हणून समाविष्ट करण्यारकरीता अर्ज दिला. त्यामध्ये असे कथन केले की, पदमाबाई चंद्रकांत मढीकर ह्या वादी क्र. १ व २ तसेच प्रतिवादी क्र. २ व ३ यांची बहीण आहे. तसेच मयत गिताबाई बरवे हया वादी यांच्या आत्या आहेत. म्हणून त्यांच्या वारसांना आवश्यक पार्टीधारक म्हणून समाविष्ट करणे आवश्यक आहे. वादीने सदरील दावा हा न्यायालयात वाटणी होऊन स्वतंत्र ताबा मिळण्याबाबत दाखल केला.

०२. याउलट, प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे मांडून अर्ज फेटाळण्याची विनंती केली. प्रतिवादींनी असे कथन केले की, पदमाबाई चंद्रकांत मढीकर कधी वारले व त्यांचा वादी प्रतिवादी यांच्याशी काय नातेसंबंध आहे हे नमूद केले नसल्यामुळे सदरील अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०३. वादी व प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकूण अर्ज व म्हणणे पाहिले. वादीने सदरचा वाटणी होवुन स्वतंत्र ताबा मिळण्याकरीता दाखल केला. वादीने असे कथन केले की, पदमाबाई चंद्रकांत मढीकर ही वादी क्र.१ व २ तसेच प्रतिवादी क्र. २ व ३ यांची बहीण आहे. याउलट प्रतिवादींनी पदमाबाई मढीकर ही त्यांची बहीण नसल्याचे त्यांच्या म्हणण्यामध्ये नाकारले नाही. तसेच दाव्याचे स्वरुप पाहता सदरील दावा हा वादीने वाटणी होऊन स्वतंत्र ताबा मिळण्याबाबत दाखल केला. त्यामुळे मयत पदमाबाई मढीकर यांच्या वारसांना दाव्यात आवश्यक पार्टी करणे गरजेचे असल्याचे दिसून येते. त्यामुळे खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२.	वादीने पुढील तारखेपर्यंत दावा दुरुस्त करावा व दुरुस्ती दावा दाखल करावा.

Digitally signed by GANESH DATTA GURNULE
Date: 2026.04.23 14:03:56 +0530

दिनांक २३.०४.२०२६

**( जी.डी. गुरनुले)**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
खुलताबाद.